# पिकअप-दुचाकीचा अपघात, बापलेक ठार

## वरूड तालुक्यातील रावळा येथील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 11 ) –** पिकअप आणि दुचाकी झालेल्या धडकेत दुचाकीवरील बापलेक ठार झाले. मंगळवारी 11 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता वरुड तालुक्यातील रावळा गावाजवळ हा अपघात घडला. भगवान बिहारे आणि मिलिंद भगवान बिहारे (रा. गावकुंड) अशी मृतांची नावे आहेत.

प्राप्त माहितीनुसार, सोमवारी सकाळी 11 वाजता पिकअप वाहन क्रमांक एमएच 04/एफजे 1851 च्या चालकाने निष्काळजीपणाने चालवत असताना गव्हाणकुंड येथील बिहारे पिता-पुत्र यांच्या मोटारसायकल क्रमांक एमएच 31/डीएन 8812 ला धडक दिली. रावळा गावाजवळील गावकुंड येथून शेंदूरजनाघाटाकडे बिहारे पिता-पुत्र जात होते. अपघात एवढा भीषण होता की, दुचाकीस्वार मिलिंद बिहारे कचऱ्यावर पडला आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. वडील भगवान बिहारे यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. काही वेळाने त्यांचाही मृत्यू झाला. या भीषण अपघाताची माहिती मिळताच शेंदूरजनाघाट पोलिस ठाण्याचे पोलिस अधिकारी दीपक म्हाडिक आपल्या पथकासह घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. या अपघातानंतर आरोपी पिकअप चालकाने थेट शेंदूरजनाघाट पोलिस ठाणे गाठून संपूर्ण घटना पोलिसांना सांगितली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृत पिता-पुत्राचे मृतदेह शवविच्छेदनासाठी वरुड ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले. या घटनेमुळे गव्हाणकुंड गावात शोककळा पसरली आहे.

# बच्चू कडू यांना सर्वोच्च न्यायालयात दिलासा

## जिल्हा बँकेतील अविश्वास सभेला स्थगीती



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 11 ) –** जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सत्तासंघर्षाला सर्वोच्च न्यायालयाने तूर्तास स्थगिती दिली आहे. बँकेचे विद्यमान अध्यक्ष बच्चू कडू यांच्या गटातील पाच संचालकांवर अविश्वास प्रस्ताव आणण्याची तयारी विरोधी गटाने केली होती. मात्र, बच्चू कडू गटाने न्यायालयात धाव घेत यावर स्थगिती(दि.11) मिळवली आहे.

विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांना सहकार विभागाकडून अपात्रतेसंबंधी नोटीस मिळाली आहे. त्यावर 24 फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे. दरम्यान, बँकेच्या कारभारावर वर्चस्व मिळवण्यासाठी विरोधकांनी 14 फेब्रुवारीला कडू गटातील पाच संचालकांवर अविश्वास ठराव आणण्याचा निर्णय घेतला होता. बच्चू कडू यांनी या विरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर आगामी 14 फेब्रुवारीला होणार्या अविश्वास सभेला स्थगीती दिली आहे. या निर्णयामुळे कडू गटाला दिलासा मिळाला तर विरोधी गटाला धक्का बसला आहे.

सोमवारी (दि.10) यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. सहकार व राजकीय क्षेत्राचं लक्ष लागलेल्या या प्रकरणाला न्यायालयाने 'जैसे थे' आदेश पारित केला आहे. न्यायालयाच्या आदेशाने बच्चू कडू गटाला तूर्तास दिलासा मिळाला आहे. मात्र यासह जिल्हा बँकेत सत्ताधारी व विरोधकांना बहुमतासाठी आवश्यक असलेलं संख्याबळ एकत्रित करण्यासाठी आणि रणनीती आखण्यासाठी वेळ मिळाल्याचे बोलले जात आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत 21 संचालक मंडळाची बॉडी आहे. यामध्ये माजी अध्यक्ष बबलू देशमुख गटाचे 11 संचालक बँकेत प्रतिनिधित्व करत आहेत. तर बच्चू कडू गटाचे 8 संचालक आहेत. तीन संचालकांना फोडत बच्चू कडू यांनी दोन वर्षांपूर्वी बँकेचे अध्यक्षपद काबीज केले. बच्चू कडू यांचे परंपरागत विरोधक असलेल्या बबलू देशमुख यांचं सहकारातील अस्तित्त्व संपवण्यासाठी कडूंनी सहकारात आपली सत्ता स्थापन केली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही इतर सहकारी संस्थांचे प्रतिनिधित्त्व करते. ग्रामीण अर्थकारणाला चालना देण्यासह तेथील राजकारणाची बरीच गणितं जिल्हा बँकेवर अवलंबून आहेत. बँकेत सत्तास्थापन करण्यासाठी बच्चू कडू व माजी अध्यक्ष असलेले अनिरुद्ध उर्फ बबलू देशमुख यांची सातत्याने धडपळ पाहायला मिळत आहे. अशातच बच्चू कडू गटाच्या पाच संचालकांकडून बँकेविरोधात कृती करण्यात आल्याचा आरोप करत त्यांच्यावर अविश्वास आणण्यासाठी बबलू देशमुख यांच्या गटातील बारा संचालकांनी अमरावती विभागीय निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे अर्ज दाखल केला होता. सहकार विभागाने हा अर्ज फेटाळल्यानंतर बबलू देशमुख गटाने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने विरोधकांच्या बाजूने निर्णय दिल्यानंतर सहकार विभागाने 14 फेब्रुवारी रोजी जिल्हा बँकेत विशेष सभा बोलविण्याचे निर्देश दिले होते. याच सभेत विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांवर अविश्वास आणण्याची रणनीती आखली जात होती. विरोधकांची ही रणनीती लक्षात येताच या सभेला स्थगिती द्यावी, यासाठी सर्वोच्च न्यायालयात बच्चू कडू गटाने धाव घेतली होती.

याच प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी पार पडली. बच्चू कडू यांच्या पाच संचालकांच्या वतीने ॲड. शिवाजी जाधव यांच्यासह अन्य दिग्गज वकिलांनी बाजू मांडली. तर विरोधकांच्या बाजूने अर्जदार असलेले नरेशचंद्र ठाकरे यांच्याकडून ॲड. प्रतीक बोंबर्डे यांनी बाजू मांडली.

# शिक्षक बँक अविश्वास प्रकरण सर्वोच्च न्यायालयात

## पुढील आदेशापर्यंत कारवाईवर स्थगीती




> न्यायव्यवस्थेवर आमचा विश्वास असून सहकार क्षेत्रातील लोकशाहीच्या रक्षणाकरिता मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली आहे. सर्वोच्च न्यायालयात आम्हाला निश्चितच न्याय मिळेल असा ठाम विश्वास आहे.
>
> **मंगेश खेरडे,**
> **माजी संचालक शिक्षक बँक**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 11 ) –** जि.प.शिक्षक सहकारी बँकेतील संचालकांच्या आविश्वास प्रस्ताव प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने महत्वपूर्ण निर्णय देत पुढील आदेशापर्यंत स्थगीती दिली आहे. सुनावणीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासन, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था अमरावती आणि इतर यांना नोटीस बजावून पुढील तारखेपर्यंत सदर प्रकरणात कुठलीही कार्यवाही करता येणार नसल्याबाबतचा स्टेटस को आदेश पारित केला आहे.

4 जानेवारी 2024 रोजी अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेमध्ये पाच संचालकांवर सत्ताधारी 16 संचालकांनी पारित केलेला अविश्वास ठराव मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने 27 जानेवारी 2025 रोजी निर्णय देऊन वैध ठरविला होता. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात शिक्षक बँकेचे अविश्वासाने पद कमी करण्यात आलेले माजी संचालक प्रभाकर झोड, संजय नागे, मंगेश खेरडे, मनोज चोरपगार, गौरव काळे यांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र. 3832/2025 अन्वये दि.7 फेब्रुवारी 2025 रोजी ॲड. शिवाजी जाधव यांचे मार्फत दाखल केली होती.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दाखल केलेल्या याचिकेसोबतच शिक्षक बँकेच्या पाच संचालकांनी दाखल केलेल्या याचीकेची सुनावणी दि.10 फेब्रुवारी रोजी न्यायमूर्ती पी एस नरसिम्हा आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांचे खंडपीठासमोर झाली. सदर सुनावणीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासन, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था अमरावती आणि इतर यांना नोटीस बजावून पुढील तारखेपर्यंत सदर प्रकरणात कुठलीही कार्यवाही करता येणार नसल्याबाबतचा स्टेटस को आदेश पारित केला आहे. शिक्षक सहकारी बँकेतील सत्ताधारी 16 संचालकांनी विरोधी समता पॅनलच्या पाच संचालकांवर अविश्वास पारित केल्यामुळे सहकार क्षेत्राला प्रचंड हादरा बसला होता. लोकशाहीतील विरोधी पक्षाचे अनन्यसाधारण महत्त्व विचारात घेऊन सहकार कायद्यातील अविश्वासाच्या तरतुदीना आता सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्यामुळे याबाबत अंतरिम निकाल काय येतो ? याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# वलगाव मार्गावरून दुचाकी लंपास



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 11 ) –** वलगाव मार्गावरील ॲकॅडमीकच्या प्रांगणावरून दुचाकी लंपास करण्यात आली. ही घटना 9 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. फिरदोस कॉलनी येथील रहिवासी अब्दुल नदीम अब्दुल सलीम (30) हे ॲकॅडमीकच्या प्रांगणावर हॉकीचे सामने बघायला गेले होते. त्यावेळी त्यांनी आपली दुचाकी क्रमांक एमएच 27 डीएम 4383 ही परिसरात उभी केली होती. सदर दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही बाब लक्षात आल्यावर अब्दुल नदीम यांनी नागपुरी गेट ठाण्यात तक्रार दाखल केली.

# जड वाहनातून उडणाऱ्या राखेचा बंदोबस्त करा!

## क्रांती सेनेची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 11 ) –** शहरालगत असलेल्या नांदगाव पेठ येथील रतन इंडिया विद्युत केंद्र येथून होणाऱ्या राखेच्या वाहतुकीमुळे शहर व परिसरातील वातावरण दूषित होत आहे. या जड वाहनातून निघणारी राख नागरिकांच्या आरोग्याला धोकादायक ठरत आहेत. त्यामुळे याची चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी क्रांती सेनेने मंगळवारी (दि.11) जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे निवेदनातून केली आहे.

क्रांती सेनेच्या म्हणण्यानुसार, अमरावती शहरालगत एमआयडीसी मध्ये असलेले रतन इंडिया विद्युत केंद्र नांदगांव पेठ मधील निघणार्या राख आरोग्यास धोकादायक आहे. याचा व्यवसाय करणारे व पावर प्लॉन्टचे कंत्राटधारक हे नागरिकांच्या आरोग्याची खेळत आहे. नागरीकांच्या जीवितास धोका पोहोचविणारे व जबाबदार सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांच्याविरोधात रितसर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण बोर्ड कार्यालय यांना दोनदा लेखी तक्रार,माहिती संघटनेच्या वतीने देण्यात आली आहे. तसेच प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनाही लेखी तक्रार देण्यात आली आहे. मात्र, संबंधित विभागाने यावर कोणतीही दंडात्मक व कायदेशिर कार्यवाही केलेली नसल्याचे क्रांती सेनेने म्हटले आहे. त्यामुळे आगामी 10 दिवसात अवैद्य राखेची वाहतुक करणारे ट्रक यांच्यावर व शासन व प्रशासनामधील कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष रितेश तेलमोरे, उपाध्यक्ष प्रदीप उसरे, आकाश इंगळे, आकाश मोहोळ, गौरव छापणे, आकाश ससाणे, विजय इंगळे, दीपक थोरात, हर्षित नंदेश्वर, तेजस मोहोड आदी उपस्थित होते.



# ब्राह्मणवाडा गोंविंदपूर येथील शासकीय जागेवर बेकायदेशीर बांधकाम

## मनीष धुर्वे यांचे ग्रामपंचायत समोर आमरण उपोषण

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव पेठ ( दि. 11 ) –** ब्राह्मणवाडा गोंविदपुर येथील शासकीय जागेवर बेकायदेशीर बांधकाम रोखण्यासाठी बिरसा ब्रिगेड महाराष्ट्रचे जिल्हा उपाध्यक्ष मनीष धुर्वे यांनी सोमवारपासून ब्राह्मणवाडा ग्रामपंचायतच्या प्रांगणात आमरण उपोषण सुरू केले आहे.

केम्स जुपीटर प्रायव्हेट लिमिटेड मुंबई या कंपनी व्दारे मौजे ब्राम्हणवाडा गोंविदपुर गट नं 247 मध्ये शासकीय जमिनीवर अनधिकृतरित्या व बेकायदेशीर होत असलेल्या बांधकामाला स्थगिती देवुन दंडात्मक कारवाई करण्याची मागणी उपोषणकर्ते मनीष धुर्वे यांनी केली आहे. ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा गोंविदपुर यांच्या वतीने 24 ऑगस्ट 2023 रोजी बेकायदेशीर व महसूल अधिनियमाचे उल्लंघन करत केम्स जुपीटर प्रायव्हेट लिमिटेड मुंबई या कंपनीला नाहरकत प्रमाणपत्र प्रमाणपत्र देण्यात आले. परंतु या कंपनीला विभागाची कोणतीही मान्यता नसून संबंधित विभागाची पुर्व परवानगी नसल्याने कंपनीला देण्यात आलेले नाहरकत व ग्रामसभा ठराव रद्द करण्यात यावा या मागणीचे निवेदन मनीष धुर्वे यांनी काही दिवसांपूर्वी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलिस अधिक्षक अमरावती तसेच खा. बळवंत वानखडे यांना दिले होते. शिवाय धुर्वे यांनी ग्रामपंचायतला निवेदन देवून लोकशाही मार्गाने आमरण उपोषणाचा इशाराही दिला होता. मात्र यासंदर्भात शासनस्तरावर कोणत्याही प्रकारची दखल घेण्यात न आल्याने मनीष धुर्वे यांनी 10 फेब्रुवारी पासून लोकशाही मार्गाने आमरण उपोषण सुरू केले आहे. ग्रामपंचायतच्या वतीने सुरू असलेल्या या गंभीर प्रकाराबाबत शासन अद्यापही निर्णय घ्यायला तयार नसून ही गावकऱ्यांची शुद्ध फसवणूक असल्याचा आरोप मनीष धुर्वे यांनी केला आहे.यावेळी नितीन भुयार, अनिकेत घरडे, प्रमोद धुर्वे, दर्शन रामटेके,सुमित मोहोड, सचिन तायडे, तेजस मोहोड, विलास मोहोड,शुभम मेश्राम, सुनील मेश्राम, प्रशांत बावनकर, स्वप्निल घरडे,महादेव गौरखेडे, सुधिर मोहोड, योगेंद्र मेश्राम,आदित्य भुयार,कुणाल भुयार, प्रथमेश टेकाडे,चेतन भुयार,कुणाल केवतकर, सर्वेश भुयार, अक्षय भुयार,चंदन उके, विनोद ठाकरे,राजु बरोटकर, प्रणय बनसोड, अक्षय मोहोड, विशाल भोयर, जगदिश बनसोड, आशिष घोडेस्वार,योगीराज लांजेवार, गोपाल भुयार,स्वप्निल पेढेकर, अक्षर घोडेस्वार, सागर बनसोड, सुधिर शिंगळे, रविंद्र मोहोड, धर्मराज कावरे, सुधिर मोहोड, आदी गावकरी मंडळी उपोषणस्थळी उपस्थित होते.

# महादेवखोरी परिसरातून मालवाहू वाहन चोरले

**अमरावती –** महादेवखोरी परिसरातील पुलाजवळील मोकळ्या जागेत उभे असलेले मालवाहू वाहन चोरून नेण्यात आले. ही घटना 9 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. फ्रेजरपुरा येथील रहिवासी नाजीम जुम्मा लालुवाले (36) यांनी आपले मालवाहू वाहन क्रमांक एमएच 04 एफडी 9556 हे महादेवखोरी येथील पुलाजवळील मोकळ्या जागेत उभे केले होते. सदर वाहन अज्ञात चोरट्याने चोरून नेले. ही बाब लक्षात आल्यावर नाजीम लालुवाले यांनी फ्रेजरपुरा ठाण्यात तक्रार दाखल केली.

# कृषी प्रदर्शनीच्या माध्यमातून अमरावतीकरांना पर्वणी

## कृषिज्ञान, खवय्यांसाठी अस्सल वैदर्भीय खानावळींचे स्टॉल्स, विविध खाद्य पदार्थांची रेलचेल, बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमांची मैफल
















**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.11 ) –** शहरात कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेमार्फत दि. 14 ते 18 फेब्रुवारी दरम्यान सायन्सस्कोर मैदानावर कृषी विकास परिषद व प्रदर्शनी आयोजित करण्यात आली आहे. आत्माच्या वतीने पाच दिवसीय कृषी प्रदर्शनात कृषिज्ञान, खवय्यांसाठी विविध खाद्य पदार्थांची रेलचेल, बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमांची मैफल आयोजित करण्यात आली आहे. यात कृषिविषयक आधुनिक तंत्रज्ञानाची माहितीही मिळणार आहे.

सकाळी दहा ते रात्री दहा वाजेपर्यंत कृषीविषयक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मिर्झा एक्सप्रेस, सुर नवा ध्यास नवा, हास्याचे तिखे बोल या कार्यक्रमांचे विशेष आकर्षण आहे. या प्रदर्शनीत धान्य, खाद्य, सेंद्रिय शेतमाल, शासकीय योजनांच्या माहितीसाठी स्टॉल्स राहणार आहेत. तसेच आधुनिक शेती तंत्रज्ञानासाठी कृषीला लागणाऱ्या मशिनरी आणि अवजारांचे प्रदर्शन राहणार आहे. सेंद्रीय शेतमालाची विक्रीशिवाय निविष्ठा कंपन्यांचा सहभागही राहणार आहे.

प्रदर्शनी दरम्यान दि. 15 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 7 वाजता मिर्झा एक्सप्रेस फेम डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचा विनोदी कार्यक्रम, दि. 16 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 7 वाजता कलर्स मराठी टीव्ही फेम साहिल पांढरे यांचा सुर नवा ध्यास नवा, चला हवा येऊ द्या फेम प्रविण तिखे यांचा हास्याचे तिखे बोल हे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. प्रदर्शनीत 200 स्टॉल्स राहणार आहेत. यातून नागरिकांना शासकीय योजनांची माहिती देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे प्रदर्शनीच्या ठिकाणी सुरक्षा, आरोग्य पथक तैनात राहणार आहे.

कृषी प्रदर्शनीचे आयोजन मोठ्या स्वरूपात करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये जागृती होण्यासाठी याठिकाणी शाळांच्या सहली देखील येणार आहेत. या प्रदर्शनाच्या माध्यमातून महिलांमध्ये आत्मविश्वास वाढवून त्यांचा उद्योजकीय विकास घडवून आणणे, त्यांना सातत्याने रोजगाराच्या संधी आणि बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यांनी तयार केलेल्या वस्तूंची बाजारपेठेशी सांगड घालून देण्याचे काम प्रदर्शनीच्या माध्यामातून करण्यात येणार आहे. जिल्हा कृषी प्रदर्शनामध्ये स्वयंसहायता महिला बचत गटांचे स्टॉल्स लागणार आहेत. विविध हस्तकलेच्या वस्तू तसेच तयार खाद्य पदार्थ, धान्य यांचे स्टॉल्स तसेच नित्योपयोगी वस्तूंचे स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. येथे अस्सल वैदर्भीय खानावळीचे स्टॉल्स लागणार आहेत. बचतगटातील महिलांना, शेतकरी बांधवांना प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांनी कृषी प्रदर्शनीला आवर्जून भेट द्यावी. असे आवाहन माहिती अधिकारी अपर्णा यावलकर यांनी केले आहे.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन विभाग, अमरावती**

e-mail ID :- eemjpdivamt@gmail.com Ph. No.0721-2550538

**निविदा सुचना क्र. ६५ सन २०२४-२५**

**कामाचे नांव:-** अमरावती /105 गांवे पाणी पुरवठा योजना (देखभाल व दुरुस्ती) अंतर्गत एकूण 6 कामाची निविदा मजीप्रा जलव्यवस्थापन विभाग अमरावती यांचे कडून बी 1 पध्दतीने मागविण्यात येत आहेत. सदर कामा करीता कंत्राटदारांनी कोरी निविदा मिळण्यासाठी अर्ज करावयाच्या दि. 12/02/2025 दि. 17/02/2025 पर्यंत राहील व कोरी निविदा विक्री कालावधी दि. 12/02/2025 पासुन दि. 19/02/2025 पर्यंत राहील. तसेच सिलबंद निविदा सादर करण्याचा दि. 21/02/2025 आहे.

सदर प्रकारची कामे केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र सविस्तर निविदेसूचनेत नमुद केल्यानुसार सादर करणे आवश्यक राहील, अन्यथा कोरी निविदा फॉर्म दिल्या जाणार नाही.

सविस्तर निविदा सुचना पूर्व अर्हताच्या अटी सहीत विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर पहावयास मिळेल.

**( विवेक सोळंके )**
**कार्यकारी अभियंता**

**वि.मा.का./अम./जाहि./११३१/२०२४-२०२५**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# हतरु आरोग्य केंद्रात मोबाईल टॉर्चच्या उजेडात उपचार

## 5 फेब्रुवारीपासून वीज पूरवठा खंडित ● सोलर लाईटही बंद, रुग्ण अंधारात

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, (दि. 11)** - मेळघाटातील हतरु या दुर्गम भागात वसलेल्या गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील भीषण वास्तव समोर आले आहे. येथे विजेअभावी डॉक्टरांना रुग्णांवर चक्क मोबाईल टॉर्चच्या प्रकाशात उपचार करण्याची वेळा आली आहे. येथे सोलर लाईटची व्यवस्था असली तरी बहुतांश वेळी हे लाईट बंदच राहतात. त्यामुळे उपचारासाठी भरती असलेल्या रुग्णांवर रात्रभर अंधारात राहण्याची वेळा येत आहे. 5 फेब्रुवारी रोजी येथील विद्युत व्यवस्थेत बिघाड झाला, मात्र अद्यापही त्यात दुरुस्ती करण्यात आलेली नाही. परिणामी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून आरोग्य यंत्रणेबद्दल रोष व्यक्त केला जात आहे.



हतरु हे मेळघाटच्या अत्यंत दुर्गम भागात वसलेले एक मोठे गाव आहे. येथे शासनाचे प्राथमिक आरोग्य केंद्र असून परिसरातील सुमारे 40 गावांतील नागरिक उपचारासाठी या आरोग्य केंद्रावर अवलंबून आहेत. आरोग्य केंद्रात कार्यरत डॉक्टर, परिचारिका आणि अन्य कर्मचारी मुक्कामी राहुण सेवा देतात. अनेक रुग्णांना उपचारासाठी भरती करुन घेण्याची व्यवस्था आहे, मात्र येथील विद्युत व्यवस्थेत 5 फेब्रुवारी रोजी बिघाड झाला असून त्याची दुरुस्तीच करण्यात आलेली नाही. विजेच्या अभावामुळे रुग्णांवर उपचार करताना डॉक्टरांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून रुग्णांचेही हाल होत आहेत.

वीज नसते आणि सोलरचे जे लाईट बसविलेले आहेत, तेही बंद असतात त्यामुळे चक्क मोबाईल टॉर्चच्या प्रकाशात डॉक्टर येथे रुग्णांवर उपचार करताना दिसतात, अशी भयावह स्थिती आहे.

रात्री-अपरात्री एखादी गरोदर महिला प्रसूतीसाठी आल्यास येथील यंत्रणेची चांगलीच तारांबळ उडते. परिणामी हतरु प्राथमिक आरोग्य केंद्रात तात्काळ दुरुस्ती करुन वीज उपलब्ध करुन द्यावी आणि सोलर लाईट कायमस्वरुपी सुरु राहतील, अशी व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

### पाण्याचाही अभाव

हतरु प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांची अवहेलना केवळ वीजेवरच थांबत नाही तर येथे रुग्णांकरिता अनेकदा पिण्याचे पाणीही उपलब्ध नसते. आरोग्य केंद्रातील बोअर बंद असल्याने डॉक्टर व कर्मचा ?यांनाही पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे सर्वांचीच गैरसोय होत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना भटकंती करावी लागत असल्याचे चित्र नजरेस पडते.

हतरु आरोग्य केंद्रातील विद्युत व्यवस्थेत 5 फेब्रुवारी रोजी रात्री बिघाड झाला. त्यात अद्यापही दुरुस्ती करण्यात आलेली नाही. डॉक्टर व कर्मचारी मोबाईलच्या प्रकाशात उपचार करत आहेत. प्रसूती अंधारात करण्याची वेळा येथील यंत्रणेवर आली आहे. त्यामुळे उपचारात अनेक अडचणी येत आहेत. येथील वीज पूरवठा तात्काळ सुरळित करण्यात यावा आणि सोलर लाईटची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी मागणी चिखलदरा पंचायत समितीचे माजी सभापती नानकराम ठाकरे यांनी केली आहे.

# विभागीय क्रीडा स्पर्धेत अमरावती जिल्हा सलग तिसऱ्यांदा विजेता

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती( दि.11 )** - अमरावती जिल्ह्याने विभागीय क्रीडा स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. अकोला येथे 7 ते 9 फेब्रुवारी 2025 दरम्यान झालेल्या स्पर्धेत विभागातील पाचही जिल्ह्यांनी सहभाग घेतला.



जिल्ह्याच्या कामगिरीत जिल्हा प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले. जिल्हाधिकारी सौरभ कटियार, अपर जिल्हाधिकारी सुरज वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, अधीक्षक निलेश खटके आणि तहसीलदार विजय लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. स्पर्धेसाठी मुन्ना उर्फ महेंद्रसिंग ठाकूर, रामानंद सरस्वती, सुजित सरोदे, सागर बनसोडे, विवेक आकोलकर, दिनेश गवई, दीपक शिरसाट, वर्षा राठोड, सुनिता तिरमारे, रुपाली आंबेकर, माधुरी सगणे यांनी पुढाकार घेतला.

# सेवानिवृत्त शिक्षक दिनेश देशमुख यांचा सत्कार

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, (दि. 11)** - कोटमी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत सात वर्ष शिक्षक म्हणून सेवा दिलेले दिनेश देशमुख नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. या कालावधीत त्यांनी विषय शिक्षकासोबतच प्रभारी मुख्याध्यापक पदाची जबाबदारीही उत्तमरीत्या सांभाळली. त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल कोटमी गावातील रहिवासी तसेच चूरणी, हातरू, राहू, बारूगव्हाण या केंद्रांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



शिक्षक म्हणून काम करण्यासोबतच त्यांनी परिसरामध्ये सामाजिक क्षेत्रातही योगदान दिले. विद्यादानाचे काम करतानाच मनमिळावू स्वभावातून त्यांनी अनेक मित्र जोडले. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा व्यवस्थापन समिती तसेच विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी या सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. त्याबद्दल दिनेश देशमुख यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमाला चुरणी केंद्राचे प्रमुख सुरेंद्र आर्डक, शिक्षक जयेश वसले, विपिन राठोड, रघुनाथ कवडे, कोटमी गावातील ग्रामस्थ, पोलीस पाटील आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# घुईखेड येथे कळस बसविण्याचा ऐतिहासिक कार्यक्रमात भाविकांची मांदियाळी

## गोत आंबिल महाप्रसादाने बेंडोजी महाराज संजिवन समाधी सोहळ्याची सांगता

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, (दि. 11)** - श्री. संत बेंडोजी महाराज यांचे संजिवन समाधी सोहळ्याच्या शेवटच्या दिवशी रविवारी (ता. 9) गोत आंबिल महाप्रसादाने सोहळ्याची सांगता झाली. यावेळी कळस बसविण्याचा ऐतिहासिक कार्यक्रमात भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती. सदर कार्यक्रमावेळी मंदिर परिसर भक्तांनी 'हाऊसफुल्ल' झाले होते.

चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील प्रसिध्द श्री. संत बेंडोजी महाराज यांचे संजिवन समाधी सोहळ्याला यावर्षी 30 जानेवारीपासुन सुरूवात झाली होती. 4 फेब्रुवारीपर्यंत संगीतमय देवी भागवत कथा प्रवक्ता ह.भ.प. संगिताताई करंजीकर यांच्या वाणीतून प्रवचन झाले. यानंतर 5 फेब्रुवारी रोजी गोपालकाला, शोभायात्रा, दहिहांडी आणि महाप्रसाद पार पडले. याचदरम्यान 6 व 7 फेब्रुवारीला जंगी शंकरपट सुध्दा उत्साहात झाले. या सोहळ्याच्या शेवटच्या दिवशी बेंडोजी बाबा मंदिराच्या कळसाची 33 फुट उंची केल्यामुळे नविन कळस बसविण्याचा कार्यक्रम 9 फेब्रुवारी, रविवारला पार पडला. सकाळी 7 वाजता कळस पुजन व होम पुजन त्यानंतर 10.30 वाजता कळस बसविण्याचा ऐतिहासीक कार्यक्रम वारी (भैरवगड) येथील महंत कृष्णानंद भारती महाराज यांच्याहस्ते व सैयाजी बाबा येळाकेळी, रुपमसिंग सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत मोठ्या थाटात पार पडला. यावेळी भाविकांचा महासागर उसळला होता. तर शेवटी दुपारी गोत आंबिल महाप्रसादाने संत बेंडोजी महाराज संजिवन समाधी सोहळ्याची सांगता करण्यात आली. या संजीवन समाधी सोहळ्याकरिता तन-मन-धनाने सहकार्य करणाऱ्या गावकरी व भाविक भक्तांचे संस्थानचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, विश्वस्त प्रवीण घुईखेडकर, राजाभाऊ चौधरी यांनी आभार व्यक्त केले.



### खा. काळे व आ. खोडकेंची भेट

महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे, अमरावती मतदारसंघाच्या आमदार सुलभा खोडके, माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप, अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे, अभिजीत बोके यांनी घुईखेड येथील मंदिरात भेट देऊन श्री संत बेंडोजी महाराजांचे दर्शन घेतले. यावेळी सर्वांचा संस्थानच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. यानंतर खासदार अमर काळे यांनी गावकरी व भाविक भक्तांसमवेत विविध विषयांवर चर्चा सुद्धा केली.

# लोणी येथे सॅनिटरी नॅपकिन वितरण व मार्गदर्शन

## केशवराव क्षिरसागर जागृत विद्यालयात आयोजन



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, (दि. 11)**- वरुड येथील जागृत नवयुवक शिक्षण संस्थेद्वारा संचालित लोणीच्या स्व. केशवराव क्षीरसागर जागृत विद्यालय येथे महिला विकास मंचाच्या वतीने सॅनिटरी नॅपकिनचे वितरण व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला विकास मंचच्या संस्थापक सचिव व माजी नगराध्यक्ष जया नेरकर या होत्या. यावेळी प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ मीना बंदे यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी म्हणून कवयित्री व लेखिका मंदा फोकमारे, महिला विकास मंचच्या संघटिका मंगला कुकडे उपस्थित होत्या. डॉ मीना बंदी यांनी आपल्या मार्गदर्शनातून विविध मानवी मूल्यांचे आदर्श दर्शन उपस्थित महिला व विद्यार्थिनींना संवादातून घडविले. निरोगी आरोग्यासाठी त्यांनी मोलाची माहिती दिली. मंदा फोकमारे यांनी स्वरचित कविता सादर करून स्त्रियांतील अस्तित्वाची जाणीव करून दिली. मंदा फोकमारे यांनी त्यांचा आधार काव्यसंग्रह व इतर पुस्तके शाळेच्या वाचनालयाकरिता भेट म्हणून मुख्याध्यापक साहेबराव पेठे यांच्या सुपूर्द केली. इयत्ता आठवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थिनींना सॅनेटरी नॅपकिन्सचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन रंजना काळकर यांनी तर आभार प्रदर्शन वैशाली लाड यांनी केले. श्रीमती जानकीदेवी गांधी जागृत विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका विद्या यावलकर व नूतन वानखडे यांनी शाळेला सदिच्छा भेट देऊन शाळेच्या प्रगतीबद्दल गौरवोद्गार काढले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक साहेबराव पेठे, अमित देशमुख, निळकंठ नेरकर, वैशाली लाड, पी. टी. मुंदाने, दीपक दुपारे, रंजना काळकर, कीर्ती पाचघरे, चेतन तडस, अरविंद देशमुख, अनिल पोहरकर, सुरेश उईके, अर्चना पाटील यांनी परिश्रम घेतले.



# चौराकुंड येथे सद्भावना वनसंरक्षण दौड उत्साहात

## सिपना वन्यजीव विभागाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**धारणी, (दि. 11)** - सिपणा वन्यजीव विभागाच्या वतीने चौराकुंड येथे सद्भावना वनसंरक्षक जनजागृती दौडचे आयोजन करण्यात आले होते. वनसंरक्षणाकरिता चलो हम दौडेंगे जंगल के लिए या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम होता. त्यात शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी व गावातील महिला- पुरुषांनी मोठ्या संख्येने व उत्साहात सहभाग घेतला.

शालेय स्तर व खुला स्तर अशा दोन गटात ही दौड स्पर्धा घेण्यात आली. प्रत्येक गटातील विजेत्या स्पर्धकांना पुरस्कार देण्यात आले. शालेय गटातून विश्वनाथ प्रकाश कासदेकर यांनी प्रथम राज दीपक उईके द्वितीय तर दिपेंद्र जितेंद्र भिकार यांनी तृतीय पुरस्कार प्राप्त केला. तर मुलींमधून प्रथम पुरस्कार करुणा हिरालाल जामुनकर, द्वितीय पुरस्कार दीक्षा सुरेश भुस्सुम तर तृतीय पुरस्कार किरण किशोर कासदेकर हिला प्राप्त झाला. खुल्या गटात पुरुषांमधून संदीप सज्जूलाल कासदेकर यांनी प्रथम, संदीप गणेश कासदेकर यांनी द्वितीय तर सुरेश हिरा बेठेकर यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

महिला गटातून सुनिता मुंगीलाल कासदेकर प्रथम, राधा नारायण धांडे द्वितीय, रेणुका सुधाकर दारशिंबे तृतीय पुरस्काराची मानकरी ठरले. याप्रसंगी चौराकुंडचे वनपरिक्षेत्र अधिकारी रवींद्र खेरडे, वनपाल रोशन कुडवे, स्वप्निल देशमुख, भावना बनाफर, हर्षवर्धन सराटकर तसेच जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक कुर्हेकर, वन कर्मचारी सुरेश भगत, दिनेश चिमोटे, संजय भगत, रोशन मावसकर, लोकेश ढेंबरेकर, माला वेठेकर, सुषमा बेठेकर, वैष्णवी मावसकर, विशाखा कासदेकर, कलीराम कासदेकर, फालतू कासदेकर, छोटेलाल कासदेकर, सोमाजी अखंडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

### अल्पवयीन मुलीला पळविले

**अमरावती** - एका अल्पवयीन मुलीला पळवण्यिात आले. ही घटना मोर्शी ठाण्याच्या हद्दीत 9 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. एक 16 वर्षीय मुलगी ही तच्यिा कुटुंबीयांना घरी दिसून आली नाही. कुटुंबीयांनी तिचा सर्वत्र शोध घेतला. नातेवाइकांकडे विचारणा करण्यात आली. मात्र, तिचा पत्ता लागला नाही. अशात तिला कुणीतरी अज्ञाताने पळवून नेल्याचा संशय आल्याने कुटुंबीयांनी मोर्शी ठाण्यात तक्रार दाखल केली.

### तरुणाची गळफास लावून आत्महत्या

**अमरावती** - एका तरुणाने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील राठीनगर येथे 9 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. राजकुमार राजाराम उंबरकर (26, रा. राठीनगर) असे मृतकाचे नाव आहे. राजकुमार याने राहत्या घरी गळफास लावला. ही बाब कुटुंबीयांच्या लक्षात आल्यावर गाडगेनगर पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला व मृतदेहाला शववच्छिेदनासाठी जल्हिा सामान्य रुग्णालयात पाठवण्यिात आले. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली.


### जाहीर नोटीस

माझे पक्षकार राजेश पांडुरंग ठाकरे, रा. कांता नगर, कॅम्प, अमरावती, ता. जि. अमरावती यांच्या कडुन सर्व लोकांना सुचित करण्यात येते ते येणेप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन खालील प्रमाणे :-**

१) जि. प. अमरावती व नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण वि. कचेरीचे कक्षेतील व ग्राम पंचायत असलेले मौजे- सुलतानपुर, प्रगणे - नांदगांव पेठ, ता. जि. अमरावती येथील शेत भुमापन क्रमांक व उपविभाग ४२, भो. वर्ग-१, क्षेत्रफळ १ हे. ०० आर. आ.रु. ५.७२ पै. हिस्सा सालिम, कोरडवाहू शेतजमीन यात असलेल्या झाडाझुडपासहीत व तदंगभूत वस्तुसह असेलेली शेतजमीन ज्याची चतुः सिमा खालीलप्रमाणे-

पूर्वस :- सरकारी जमिन
पश्चिमेस :- लेआऊट रस्ता
उत्तरेस :- अंबाडकर यांचे शेत
दक्षिणेस :- अब्दुल रहिम यांचे शेत

वरील वर्णनांकीत मालमत्ता संबंधीत आम्ही खरेदीविक्री चा सौदा करीत असुन वर वर्णनांकीत शेतजमीनीबाबत वत्सला श्रीराम चौधरी, रा. हनुमान चौक, वलगाव, ता. जि. अमरावती यांच्याशी दि. १२/१२/२०२४ रोजी इसार झालेला आहे व दि. १२/०४/२०२६ ही खरेदी करण्याची तारीख ठरलेली आहे. तरी सर्व लोकांना सुचीत करण्यात येते की, वरील मालमत्तेसंबंधी कोणासही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा आक्षेप असेल तर सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत खालील मोबाईल क्रमांकावर आक्षेप वा हरकत घ्यावी, नंतर कुठलीही उजर चालणार नाही.

कृपया याची नोंद घ्यावी.

**दिनांक :- १२/०२/२०२५**

**ॲड. आर. डी. बाकडे**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती.**
**मो. नं. 9884768048**


# शहरातील आकांक्षी स्वच्छतागृहे पाच दिवसात सुरू करा!

## प्रहार जनशक्ती पक्षाचा इशारा ● विभागीय आयुक्तांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 11)** शहरातील पाच ठिकाणी आकांक्षी स्वच्छतागृहे उभारली गेली आहेत. त्यावर महापालिका प्रशासनाने सुमारे 2.5 ते 3 कोटी रुपये खर्च केले आहेत. मात्र, त्या ॲस्पिरेशनल टॉयलेट्स च्या मेंटेनन्ससाठी कुणीही समोर आलेले नाही. कंत्राटदार, संस्था समोर न आल्याने %ॲस्पिरेशनल टॉयलेट्स%च्या ऑपरेशन व मेन्टेनन्ससाठी निविदा बोलावण्यात आलेली आहे. तसेच या सर्वांची जबाबदारी मनपाच्या आरोग्य विभागाकडे देण्यात आली आहे. मात्र, आजवर अनेक अडचणींना सामोरे जात हे टॉयलेट्स धूळखात पडले आहेत. त्यामुळे ही आकांक्षी स्वच्छतागृहे पाच दिवसांत सुरू करण्यात यावी,अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे महानगर प्रमुख बंटी रामटेके यांच्या नेतृत्वात मंगळवारी(दि.11) विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्याकडे निवेदनातून केली आहे.




अडीच वर्षापूर्वी फेब्रुवारी महिन्यात महापालिका क्षेत्रातील शेगाव नाका, वेलकम पॉइंट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अंबादेवी मंदिरासमोर, राजकमल चौक, मालटेकडी व साईनगर चौकात ॲस्पिरेशनल टॉयलेट्स बांधण्यासाठी सुमारे 1 कोटी 9 लाख रुपयांची निविदा निघाली. प्रत्यक्षात वेलकम पॉइंट परिसरातील अतिक्रमणामुळे तेथील ॲस्पिरेशनल टॉयलेट्सची उभारणी अडचणीत आली. त्यात अन्य देखील अडसर आलेत. वेलकम पॉईंट्स वगळता गांधी चौक, शेगाव नाका, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, बडनेरा बसस्टॉप व छत्री तलाव रस्त्यावर झोन निहाय आकांक्षी स्वच्छता गृहांची उभारणी पूर्ण झाली आहे. मात्र, ते नागरिकांसाठी खुले झालेली नाहीत. आजही आकांक्षी शौचालय धूळखात पडून आहे. त्यामुळे नागरिकांना त्याचा वापर करता येत नाही. त्यामुळे आगामी पाच दिवसात आकांक्षी शौचालय सुरू करण्यात यावे. अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल. असा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाने निवेदनातून दिला आहे.

यावेळी प्रहार प्रदेश प्रवक्ते जितू दुधाने, जिल्हाध्यक्ष अभिजित देशमुख, संपर्क प्रमुख गोलू पाटील, संघटक श्याम इंगळे, नंदकिशोर कुयटे, शेख अकबर, अभिजीत गोंडाणे, मनीष पवार, योगेश कावरे, उमेश मेश्राम, शेषराव धुळे, अमित तायडे, विक्रम जाधव, अजय तायडे, नंदू वानखडे, कुणाल खंडारे, अभिजीत तायडे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.


### जाहिरनामा

या जाहीरनामा द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते कि, माझे पक्षकार रियाज अहेमद खान नियाज अहेमद खान, रा. पो. ता. कारंजा लाड, वाशिम यांच्या सोबत 1. चितामन घासीराम गोर 2. गोकुल चितामन गोर 3. दिनेश चितामन गोर 4. दिपक चिंतामन गौर (संमतीदार) सर्व रा. दुर्गा माता मंदिर, अंजनगाव सुर्जी पो. ता. अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती झालेले मिळकत अदलाबदली चा करारनामा दि. 30/06/2022 रोजी नोटरी क्र. 230/2022 रोजी करारनामा लिहून घेणार रियाज अहमद खान नियाज अहेमद खान, रा. कारंजा लाड, जि. वाशिम यांचे सोबत मोजे - खेलबाबूजी (531771), प्र.पो. तु. अंजनगाव सुर्जी, जि.प.व. नो. जि. अमरावती येथील शेत सर्व्हे नं. 25/2 मधील हे. 28 आर. जमीन पैकी हे. 25 आर. जमिनीची चर्तुः सिमा :- पुर्वस :- क्रांती भंगारवाला, पश्चिमेस आरके स्टील, उत्तरेस अंजनगांव अकोट रोड, दक्षिणेस :-नाला. सदर 0 हे. 25 आर. जमिनीची एकंदर सौदा रक्कम रुपये 5,60,00,000/- (अक्षर पाच कोटी साठ लाख रुपये फक्त) मध्ये झाला होता व माझे पक्षकार रियाज अहेमद खान नियाज अहेमद खान यांची मिळकत.

अ) मौजे मोरांगणा, प्र.पो.तु.ता. अमरावती, जि.प. व नॉ. जि. अमरावती येथील शेत सर्व्हे नं. 17व शेत सर्व्हे नं. 94 मधील निवासी वापराचे प्लॉट्सचे एकंदर क्षेत्रफळ अंदाजे 60,000 चौ. फुट (सदर लेआऊटचे पार्टी नं. 1 यांना देत असलेले प्लॉटचे सविस्तर मोजमापासह वर्णन

यास चर्तुः सिमा मंजुर नकाशानुसार,

सदर प्लॉटचा भाव प्रती चौ. फुट रुपये 500/- (पाचशे रुपये फक्त) प्रमाणे एकंदर सोदा रक्कम रुपये 3,00,00,000/- (अक्षरी तीन कोटी रुपये फक्त) होता.

करारानुसार माझे पक्षकार यांची मिळकतीची किंमत तुमच्या मिळकतीनुसार कमी होती व त्याकरीता माझे पक्षकार यांनी तुम्हाला रु. 5,00,000/- (अक्षरी पाच लाख रुपये) या कराराबद्दल बँकेमार्फत दिले होते जे तुम्हाला मिळाले व तसेच दि. 15/09/2022 चे दिवशी रु. 64,49,000/-(अक्षरी चौसष्ट लाख एकोणपन्नास हजार रुपये) तुम्हाला ईसार म्हणून दण्याचे ठरले होते. पण त्यावेळी माझे पक्षकार यांची पुर्ण खरेदीबद्दल तयारी झाली होती. त्या अनुषंगान माझे पक्षकाराने आपले करारनामा मधील संमतीदार व मध्यस्ती करणारे शंकरराव नारायणराव कोकाटे व हफीज उल्लाखान सना उल्लाखान (साक्षीदार) व आणखी खालील दोन साक्षीदार यांच्या मध्यस्तीने तुम्हाला खरेदीबद्दल वेळोवेळी सांगितले. त्यानंतर आपल्याकडून असे उत्तर आल की, माझे पक्षकार यांच्याकडून तुम्ही जे मिळकत अदलाबदलीमध्ये घेतली होती त्याचे रोड, नाली, इलेक्ट्रीक चे विकास पाहणी झाल्यानंतर आम्ही खरेदीखत करुन दिले. त्यानंतर आपण माझे पक्षकारासोबत त्यांचे मिळकती जे की, मौजे मोरांगणा, ता. जि. अमरावती येथे येवून स्वतः निरीक्षण केले व आपण स्वतः समाधान झालो असे सांगितले. त्यानंतर मध्यस्ती तुम्हाला वेळोवेळी खरेदी तयार करणेबाबत सांगितले. पण आपण टाळाटाळ केली व असे सांगितले की, चिंतामन घासीराम गौर यांची तब्येत बरी नसल्यामुळे आपण खरेदीखतासाठी काही वेळी थांबावे. परंतु आपण जे टाळाटाळ करीत आहोत यामधील माझे पक्षकार यांना असे माहिती मिळाली की, आपण आपले मिळकत मौजे खेलबाबूजी, ता. अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती या दुसऱ्यांना विकण्याची प्रयत्न करीत आहेत. करिता दिनांक 18/01/2023 रोजी याबाबत वकीला मार्फत नोटीस देण्यात आली होती व ती नोटीस त्यांना मिळालेले आहे. करिता आपल्याला या जाहिरनाम्या द्वारे कळविण्यात येते की, सदहूं मिळकतीचे व्यवहार लिहुन देणार 1 ते 4 यांच्या सोबत करू नये केल्यास तर रद्द करून घ्यावे. न केल्यास यांच्या सोबत झालेले टोकन चिठ्ठी, सौदा चिठ्ठी, करणारा, खरेदीखत अमान्य ठरणार याची नोंद घ्यावी. जर असे झाले, तर सर्व बाबीची जबाबदार आपणावर ठरणार व याकरीता माझे पक्षकार यांना जर कोर्टात जाण्याचे वेळ पडले तर कोर्टात लागणारा सर्व खर्च व इतर नुकसान भरपाईची सर्व जबाबदारी आपल्यावर राहील, याची नोंद घ्यावी.

करिता या जाहिरनाम्या द्वारे सर्व जनतेला माहितीस सादर.

दि. ११/०२/२०२५

**ॲड. एच.डब्ल्यु. जावळकर**